REGISTERED No. B. 3434

अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.
प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

"अर्थ"
"दुर्गाधिवास" पुणें ४.

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २० जुलै, १९४९ अंक २९

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे रंग, छापण्याची शाई, एनॅमलचे कच्चे व पक्के रंग

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें १ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)

## विविध माहिती

**अमेरिकेजवळील सोन्याचा सांठा**—अमेरिकन सरकारजवळील सोन्याच्या सांठ्यानें आजपर्यंतचा उच्चांक गांठला आहे. जगांतील एकूण सोन्याचा ३/४ सांठा अमेरिकेंत असून त्याची डॉलर्समधील किंमत २४,४६,५९,२३,००० डॉलर्स इतकी आहे. अमेरिकेनें ह्या सांठ्याचा उपयोग करून ब्रिटन आणि इतर युरोपीय राष्ट्रांना मदत करावी असें त्या देशांकडून सुचविलें जात होते. परंतु अशा प्रकारच्या वार्ता आपल्या कानांवर आलेल्या नाहींत असें अमेरिकन तज्ज्ञांचें म्हणणें आहे.

**सिमेंटचें भरपूर उत्पादन**--हिंदुस्थानमधील सिमेंटच्या कारखान्यांतून यंदा सर्वांत अधिक उत्पादन होईल असा अंदाज करण्यांत येत आहे. सिमेंटच्या कारखान्यांतून होईल तितकें उत्पादन करणाच्या आणि नवे कारखाने उभारण्याच्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. नवीन कारखान्यांचें उत्पादन जमेस धरून ह्या वर्षअखेर ३१,२५,००० टन सिमेंट तयार होईल. चालू कारखान्यांचा जास्तींत जास्त उपयोग करण्याच्या कामीं वहातुकींतील अडचणी आणि कोळशाचा अपुरा पुरवठा ह्या दोन कारणांनीं विघ्नें आणलीं. हिंदुस्थानांत सगळ्यांत अधिक सिमेंट बिहार प्रांतांत तयार होतें. त्याच्या खालोखाल मद्रास, मध्यप्रांत, पूर्व पंजाब, असा अनुक्रम लागतो.

**हिंदमधील वीज-निर्मितीच्या योजना**—हिंद सरकारनें आंखलेल्या सर्व वीज-निर्मिती केंद्रांच्या योजना पार पाडण्यास १३०० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या रकमेपैकीं ४० टक्के रक्कम परदेशांतून यांत्रिक साहित्य आणण्यासाठी खर्च होणार आहे. अर्थात, डॉलर्स अगर पौंड ज्या मानानें मिळूं शकतील त्यावर ही खर्चाची बाब अवलंबून आहे. ज्या कामांच्या बांधणीस सुरवात झाली आहे तीं आधी संपविण्याचा सरकारचा विचार आहे. कोणत्या योजना आधी पूर्ण कराव्या तें ठरविण्यासाठी प्रांतिक सरकारांच्या एंजिनिअर्सची एक परिषद् चालू महिनाअखेर दिल्लीस भरविण्यांत येणार आहे.

**अमेरिकेमधील जाहिरातबाजी**—१९४८ सालांत अमेरिकेंत जाहिरातींवर ४८,३०,७०,००,००० डॉलर्स खर्च झाले. जाहिरातींवरील खर्चाचा हा उच्चांक आहे. १९४९ सालींही जवळ जवळ असाच बेफाम खर्च होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या खर्चापैकीं वृत्तपत्रांतील जाहिरातींवर ३६·२ टक्के, रेडिओवर १२·४ टक्के, मासिकांवर १०·६ टक्के, उद्योगधंद्यांच्या नियतकालिकांवर ४·८ टक्के व प्रत्यक्ष पत्रें पाठवून जाहिरात करण्यावर ११·९ टक्के खर्च झाला.

**गोपाळराव प्रकरणांतील धनको**—म्हैसूरमधील गोपाळराव प्रकरणाची चौकशी करण्यासाठी म्हैसूर सरकारनें एक खास कमिटी नेमली होती. कमिटीनें चौकशी करून गोपाळराव ह्यांच्या धनकोंना रुपयांत ४ आणे परत करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्यक्ष पैसे देण्यास प्रारंभ ता. १८ जुलै रोजीं झाला.

**शहरांतील क्षयरोगाचा फैलाव**—क्षयरोगप्रतिबंधक बी. सी. जी. नांवाचें औषध टोंचण्यासाठी स्वीडनमधील डॉक्टरांचें एक मंडळ हिंदुस्थान सरकारच्या आमंत्रणावरून हिंदमध्यें आलें आहे. ह्या मंडळाचे नेते डॉ. स्वेन्डसेन ह्यांनीं कलकत्ता येथें असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील शहरांत राहणाऱ्या लोकांपैकीं ७० ते ७५ टक्के लोकांना कमी-अधिक प्रमाणांत क्षयाची भावना झालेली आहे. डेन्मार्कमधील शहरवासीयांत हें प्रमाण १६ टक्के आहे. बी. सी. जी. औषध टोंचलेला माणूस जगण्याचा संभव, न टोचलेल्या माणसापेक्षा पांचपट अधिक आहे, असें त्यांचें मत आहे. ह्या मंडळानें आतांपर्यंत २० वर्षांखालील ३०,००० हिंदी लोकांना हें औषध टोचलें आहे.

**छापील पत्रें आणि बुकपोस्ट**—बुकपोस्ट म्हणून एखादें सर्क्युलर छापील पत्राबरोबर पाठविलेलें आढळल्यास त्याला बुकपोस्टाच्या तिकिटाच्या सवलती देण्यांत येऊं नयेत, असें सर्व पोस्ट ऑफिसांना कळविण्यांत आलें आहे. अशा प्रकारचें बुकपोस्ट 'पत्र' ह्या सदरांतच पडतें असें पोस्ट खात्याचें मत आहे.

### पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

## नोटीस.

या बँकेच्या सन १९४९-५० सालच्या हिशेबाची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेनें दोन हिशेब तपासनिसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर जागांसाठीं ज्यांस उमेदवार म्हणून उभे राहावयाचे असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें कचेरींत दि. १ ऑगष्ट १९४९ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वीं दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत. उमेदवारानें अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी अवश्य नमूद करावीत. हिशेब तपासनिसांच्या नेमणुकीसंबंधी बँकेनें केलेले नियम तिचे मुख्य कचेरींत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें शहर. दि. १२-७-४९

द. वि. चितळे. मॅनेजिंग डायरेक्टर.

### पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

## नोटीस.

या बँकेच्या सन १९४९-५० च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठीं वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा कचेरींत नोटीस बोर्डावर निवडणुकीच्या नियम नंबर ३ प्रमाणें लावली आहे. तरीं निवडणुकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवारांच्या लेखी संमतीनें तारीख १० ऑगष्ट १९४९ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वीं बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावीत. सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास त्यांनीं बँकेच्या कचेरीचे वेळांत बँकेंत चौकशी करावी म्हणजे ती त्यांना देण्यांत येईल.

पुणें शहर. दि. १२-७-४९

द. वि. चितळे. मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. २० जुलै १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## हा व्यवहार कसा जुळणार ?

### अमेरिकेची अपूर्व सुस्थिति इतरांना मारक

पौंड गटांतील देशांच्या गंभीर आर्थिक परिस्थितीवर अमेरिकन वृत्तपत्रांनीं व्यक्त केलेल्या मतास विशेष महत्त्व आहे. कारण, ही परिस्थिति सुधारण्यास अमेरिकेची मदत लागणार आहे. प्रमुख अमेरिकन वृत्तपत्रांचे अभिप्राय येथें संकलित केले आहेत, त्यांवरून ह्या प्रश्नाचा बिकटपणा व गुंतागुंत, ह्यांवर प्रकाश पडेल. १९४९–५० मध्यें ग्रेटब्रिटन आपली आयात आणखी कमी करून डॉलर चलनाच्या उपयोगांत कपात करणार आहे. दीर्घकालीन उपाययोजनेसंबंधीं साम्राज्यांतील राष्ट्रांच्या अर्थमंत्र्यांचीं खलबतें चालू आहेत. सप्टेंबरमध्यें वॉशिंग्टन येथें इंटरनॅशनल मोनेटरी फंडाकडे हें प्रकरण नेलें जाणार, हें स्पष्ट दिसतच आहे.

ग्रेट ब्रिटनला जेवढे डॉलर जरूर आहेत, ते मिळविण्यासाठी तो देश अमेरिकेला हवा असलेला माल पुरेसा स्वस्त आणि पुरेशा प्रमाणांत उत्पादन करीत नाहीं, अशी वस्तुस्थिति आहे. आणीबाणीची वेळ आली, म्हणजे तातडीचे उपाय योजतांना दीर्घकालीन उद्दिष्टें डोळ्याआड होतात, ह्याचें उदाहरण म्हणजे ब्रिटन-अर्जेंटिना व्यापारी करार, हें होय. त्याचप्रमाणें, युरोपांतील राष्ट्रांच्या एकमेकांतील व्यापारवृद्धीस ब्रिटननें विरोध दर्शविला; कारण त्यामुळें ब्रिटनच्या गंगाजळीवर फार ताण पडेल असें त्यास वाटलें.

ब्रिटिश लोकांनीं केवळ आणखी काटकसर करून, आणखी कमी जिनसा वापरून किंवा आणखी कमी पदार्थ खाऊन प्रस्तुत प्रश्न सुटणार नाहीं. तेवढ्याच वेळांतील, तेवढ्याच यंत्रावरील, दर माणशीं उत्पादन वाढलें पाहिजे. म्हणजे, इंग्रजांच्या वैयक्तिक स्वार्थ-त्यागास कामगारांच्या लक्षपूर्वक कामाची, इंजिनिअरच्या डोकेबाजपणाची आणि मॅनेजरच्या कौशल्याचीहि जोड मिळाली पाहिजे.

गेलीं दोन महायुद्धें आणि तिसऱ्याची भीति, ह्यामुळें पश्चिम युरोपचें अमेरिकेवरील व कॅनडावरील अवलंबन अतिशय वाढलें आहे. त्याचप्रमाणें, अमेरिकेला पूर्णपणें स्वावलंबी बनावें लागलें आहे. खरी अडचण अशी आहे, कीं युरोपला अगदीं अत्यावश्यक जिनसा अमेरिकेकडून घ्याव्याच लागतात परंतु अमेरिकेनें युरोपकडून घेतलीच पाहिजे, असा एकहि जिन्नस नाहीं. १९३७ मध्यें, म्हणजे जेव्हां आतांपेक्षा परिस्थिति पुष्कळच अनुकूल होती तेव्हांहि, अमेरिकेंतील उठावाच्या एक शतांशसुद्धां पक्का माल युरोपमधून तेथें आयात होत नव्हता. अमेरिकन माल घेतल्याखेरीज ज्यांना गत्यंतर नाहीं असे युरोपियन देश आणि ज्यांना युरोपियन देशांच्या मालाची गरज नाहीं अशी अमेरिका, ह्यांमध्यें व्यावहारिक नातें कसें टिकावयाचें हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

ग्रेट ब्रिटनच्या मजूर मंत्रिमंडळावर ब्रिटिश आर्थिक आपत्तीचें खापर फोडणें फार सोपें आहे, परंतु हुजूर चर्चिल अधिकारावर असते तरी ब्रिटनची गंभीर परिस्थिति नष्ट झाली नसती. ग्रेट ब्रिटन पौंडाची किंमत उतरवूं शकेल. त्यामुळें अमेरिकेंत जो ब्रिटिश माल येईल त्यास ( डॉलरच्या मापानें ) कमी किंमत पडेल. परंतु, त्यामुळें ब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या मालाची किंमत वाढून तेथील रहाणीचा खर्च भयंकर होईल, ह्याची वाट काय ?

ग्रेट ब्रिटनच्या व युरोपच्या पुढें जो डॉलर तुटवड्याचा प्रश्न उभा आहे तोच प्रश्न हिंदुस्थानापुढेंहि आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना करावयाची, तिचें स्वरूपहि त्याच प्रकारचें आहे. केवळ अमेरिकेकडेच नव्हे, तर जगांतील कोठल्याहि इतर देशाकडे हिंदी मालाची निर्गत व्हावयाची, तर तो माल तेथील स्पर्धेंत यशस्वी झाला पाहिजे. परंतु, आजची परिस्थिति पाहिली, तर परदेशी मालच येथें येऊन स्वदेशी मालाची स्पर्धा करूं पहात आहे. त्यामुळें, स्वदेशी कारखान्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न उपस्थित होऊन त्यांस संरक्षण द्यावें लागत आहे. कार्यक्षमतेनें उत्पादन झालें नाहीं, तर ह्या संरक्षणाचा बोजा केव्हां व कसा दूर होणार ? हिंदुस्थानांतील ह्या परिस्थितीचें गांभीर्य व ती परिस्थिति सुधारण्याच्या मार्गांतील अडचणी ह्यांचें आकलन होऊन सत्वर, योग्य, सर्वांगीण व कडक उपाय योजले गेले, तर दीर्घकालीन सुधारणेची अपेक्षा करणें योग्य ठरेल.

## मुलें नकोत, मग लोकसंख्या कशी टिकणार ?

गेल्या पन्नास वर्षांत पश्चिम युरोपांतील जननसंख्या घटत चालली आहे. ब्रिटनमध्येंही हीच घटना घडत असल्यानें ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी ५ वर्षांपूर्वी एक रॉयल कमिशन नेमण्यांत आलें. ह्या कमिशनवर ५ स्त्रिया आणि ८ पुरुष इतके जण काम करीत होते. त्या सर्वांना मिळून ३५ मुलें होतीं. बाळंतपण ही गोष्ट फार कष्टप्रद असून त्याची यथायोग्य कल्पना पुरुषांना असत नाहीं अशी कुरकूर व्हिक्टोरिआ राणीनें १८४१ साली लिहिलेल्या एका पत्रांत केली आहे. तरी पण व्हिक्टोरिआ राणीनें ९ वेळा मातृपद कमाविलें ! ह्याच पत्रांत जास्त मोठ्या कुटुंबामुळें गैरसोयी होतात असेंही मत राणीनें व्यक्त केलें आहे. आज इंग्लंडमध्यें ९ मुलांची आई क्वचितच सांपडते. साधारणपणें प्रत्येक जोडप्यामागें अपत्यांचें प्रमाण २·२ एवढें पडतें. तसेंच पाहिलें तर गेल्या १०० वर्षांत इंग्लंडमध्यें मातांच्या संगोपनाची सोय, सार्वजनिक आरोग्य, राहतीं घरें इत्यादी बाबींत किती तरी सुधारणा झाली आहे. संततिनियमनांच्या साधनांचा वापर अधिक होऊं लागल्यामुळें अपत्यांची संख्या घटतच गेली. मानवी इतिहासांत ४,००० वर्षांपूर्वीपासून संतति–नियमनाची पद्धत आढळून येते. तथापि संतति–नियमन आजच्या इतकें लोकप्रिय कधींच झालेलें नव्हतें.

कमिशननें १४,००,००० विवाहित स्त्रियांच्या मुलाखती घेतल्या. ब्रिटनची आजची लोकसंख्या ४·९ कोटी आहे. लोकसंख्येच्या अनुक्रमानें ब्रिटनचा आठवा नंबर लागतो. अडीचशें

वर्षांपूर्वी ब्रिटनची लोकसंख्या अवघी ७० लाख होती. ह्या लोकसंख्येची वाढ सावकाश होत होती, कारण जननसंख्या आणि मृत्यु ह्या दोघांचेंहि प्रमाण बरेंच होतें. १८०० च्या सुमारास जननसंख्येंत घट होऊं लागली. मध्यम वर्गांतील बहुतेकांना मोठीं कुटुंबें असणें आवडत नाहींसें झालें. ह्याला कारणें मुख्यतः आर्थिक होती. आज ब्रिटिश कुटुंबाला ५–६ मुलें जोपासता येणार नाहींत असें नाहीं. परंतु अधिक विकसनशील आयुष्य घालविण्याची संधि गेल्या कांहीं वर्षांत उपलब्ध झाली आहे. पांच–सहा मुलांपेक्षां एक दोन मुलांनाच अशी संधि मिळवून देणें आर्थिक दृष्ट्या सोपें होतें. शिवाय जास्त मुलें झालीं म्हणजे रहाणीचें मान खालावतें आणि मुलांना शिक्षणही नीट मिळत नाहीं. गरीब कुटुंबांत जननसंख्या अधिक असते हा अनुभव तर सर्वत्रच येतो. उलट, रहाणीचें मान वाढलें कीं अधिक सुखप्रद जीवन जगण्याची धडपडही वाढते असेंहि दिसून येतें.

## अमेरिकन मासिकांतील जाहिराती

### रंगीत जाहिराती

अमेरिकेंत प्रसिद्ध होणाऱ्या मासिकांतील जाहिरातींची छाननी केली, तर १९४८ सालांतील जाहिरातींच्या जागेपैकी एक तृतीयांश जागा चार रंगी जाहिरातींनीं व्यापली होती. त्यांत दोन रंगी जाहिराती मिळवल्या, तर एकूण जागेच्या जवळ जवळ निम्म्या (४१·९%) जागीं रंगीत जाहिराती होत्या! १९३९ सालीं फक्त १८·६% जागा चार रंगी व आणखी ११·२% जागा दोन रंगी जाहिरातींनीं व्यापलेली होती.

### अन्नविषयक जाहिराती

मासिकांतील जाहिरातींपैकी अन्नविषयक जाहिराती १०% होत्या. "जनरल फूड्स" ह्या जाहिरातदारानें १९४८ सालीं सर्वांत अधिक, म्हणजे १ कोटी, ६५ लक्ष रुपये जाहिरातींवर खर्च केले. एकट्या अन्नावर सर्वांत अधिक जाहिरात खर्च होण्याचा मान 'कँबेल सूप' ला मिळाला. त्याचेवर ८० लक्ष रुपये खर्च झाले. अन्नविषयक १२ कंपन्यांनीं प्रत्येकीं ३५ लक्ष रुपये जाहिरातींवर खर्च केले.

---

### जपानमधील महागाई आटोक्यांत येत चालली?

जपानमधील चलनवृद्धि आतां आटोक्यांत आणण्यांत आली आहे अशा वार्ता येत आहेत. चालू वर्षाच्या प्रारंभापासून नवीन चलनी नोटांच्या संख्येंत ५,००० कोटी येन चलनी घट झाली आहे. आतां २९,२०० कोटी येनच्या चलनी नोटा व्यवहारांत आहेत. जपानमधील किंमतींच्या जास्तींत जास्त पातळीपेक्षां सध्याच्या किंमती १० टक्क्यांनीं खाली आल्या आहेत. तेथील काळ्या बाजारांतील किंमती अधिकृत किंमतींपेक्षा एका काळीं ७ पटीनें अधिक होत्या. आता त्या काळ्या बाजारांतील किंमतींपेक्षां २·६ टक्केच अधिक आहेत. जपानमधील अमेरिकन अधिकाऱ्यांनीं चलनविषयक जें कडक धोरण अंमलांत आणलें त्याचाच हा परिणाम आहे. चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत उत्पादकांना देण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतींत बरीच कपात करण्यांत आली आहे. येन आणि डॉलर्स ह्यांच्या हुंडणावळीचा जो दर एप्रिल १९४९ अखेर ठरविण्यांत आला त्यामुळें जपानच्या सरकारला आयात व्यापाराला देण्यांत येणाऱ्या मदतीच्या रकमेंत अधिक कपात करावी लागली. त्यामुळें उत्पादकांना कच्चा माल स्वस्त मिळूं लागून किंमतींची पातळी अधिक उंचावूं न देण्याचें कार्य करता आलें. जपाननें चलनवृद्धीविरुद्ध जे उपाय अंमलांत आणले त्यामुळें देशांत पैशाची चणचण तीव्रतेनें भासत आहे असें म्हणतात. जपानच्या अर्थमंत्र्यांनीं अमेरिकन अधिकाऱ्यांना विनंति करून उद्योगधंद्यांना अधिक सवलतीनें कर्जें मिळविण्याचे प्रयत्न केले. परंतु जपानच्या उद्योगधंद्यांनीं आपली कार्यक्षमता वाढवून ह्या परिस्थितींतून मार्ग काढावा, असें उत्तर अर्थमंत्र्यांना देण्यांत आलें.

## वेस्टर्न इंडिया विमा कं.च्या संलग्न संस्था

(अध्यक्ष, डॉ. मो. ना. आगाशे ह्यांच्या भाषणांतील उतारा)

(१)

युनायटेड वेस्टर्न बँक ही संस्था आपणा सर्वांस सुपरिचित अशीच आहे. या बँकेचा व्याप भक्कम पायावर आस्ते आस्ते वाढतच आहे व डोळयांत भरण्यासारखी एकदम मोठी प्रगति जरी दृश्यमान होत नसली तरी तिचें भवितव्य उज्ज्वल आहे, हें खास. बँकेच्या निरनिराळ्या ठिकाणच्या वाढत्या शाखांमुळे कंपनीच्या विमेदारांची उत्तम प्रकारें सोय झाली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस योग्य नफा झाला आहे व बँकेनें भागीदारांना चांगलें डिव्हिडंड दिलें आहे.

(२)

कंपनीच्या विमेदारांच्या व एकंदर समाजाच्या विशिष्ट अशा तऱ्हेच्या अडचणी दूर करण्याच्या सद्हेतूनें वेस्टर्न इंडिया ट्रस्टी आणि एक्झीक्यूटर कंपनी लि. ही वेस्टर्न इंडियानें सुरू केलेली दुसरी संलग्न संस्था होय. ही संस्था लौकरच एकाद्या महानदीसारखी मोठी होऊन आपल्या देशाची उत्तम प्रकारें सेवा करणारी संस्था म्हणून नांवलौकिकास येईल. पहिल्याच वर्षांत या कंपनीनें जें यश मिळविलें आहे, त्यावरून कांहीं कांहीं नामवंत नागरिकांनीं कंपनीच्या कारभाराबद्दल जो विश्वास बाळगिला आहे व या कंपनीवर आपल्या कामाचा भार टाकला आहे त्यावरून आणि इतरही मंडळी, विशेषतः कारखानदार मंडळी, जी या कंपनीच्या यशाकडे लक्ष लावून पहात असलेली दिसत आहेत त्यावरून, पुष्कळच मंडळींना या संस्थेच्या मदतीची गरज आहे व अशी मदत त्या मंडळींना खात्रीनें होण्यासारखी आहे, याबद्दल मला शंका राहिलेली नाहीं. ह्या संस्थेची स्थापना एका विशेष कार्यासाठी झाली असल्यानें ज्यांना हिची उपयुक्तता पटली ते आपलें हार्दिक सहकार्य या संस्थेला मोठ्या आनंदानें देत आहेत व आपणांस कळविणेस मला संतोष वाटतो कीं, श्री. शिवराम गोविंद उपाख्य राजाभाऊ भावे हे या संस्थेच्या प्रगतीसाठी मनःपूर्वक परिश्रम करीत आहेत. त्यांच्या ध्येयवादी वृत्तीचा ट्रस्टी कंपनीला उपयोग होणार आहे असा विश्वास वाटतो.

(३)

तिसरी संलग्न संस्था विमा मुद्रक व प्रकाशक लिमिटेड ही होय. या नांवावरूनच त्या संस्थेच्या कार्याविषयीं आपणांस कल्पना येण्यासारखी आहे. वेस्टर्न इंडिया व तिच्या संलग्न संस्था यांचे कामासाठीच प्रामुख्यानें तिची स्थापना करणेंत आली आहे. या संस्थांना फार मोठी छापील स्टेशनरी लागते व तिची सर्व छपाई उत्तम प्रकारें, थोड्या अवधींत व खर्चांत सातत्यांतच होऊं शकत नाहीं. त्यामुळें छपाई करून आणणेस विलंब लागून तें कामही जिकीरीचें होत होतें. ही अडचण दूर व्हावी म्हणून स्वतः वेस्टर्न इंडियानें व तिच्या संलग्न संस्थांनीं सुमारें ५०,००० रुपयांचें भांडवल घालून वरील संस्था सुरू केली आहे व फारच थोड्या अवधींत कंपन्यांस हवें असलेलें काम ताबडतोब तयार करून मिळण्याची उत्तम सोय झाली आहे. यामुळें कंपनीचेंही बरेंच काम सुकर झालें आहे. कंपनीच्या स्वतःच्या छापखान्यामुळें छपाई काम वक्तशीर व उत्तम तर होतच आहे, पण त्याखेरीज छपाई खर्चही कांहीं अंशीं कमी होईल असें वाटतें.

### विमा वार्षिक, १९४८

"विमा आणि व्यापार" ह्या मासिकाचा मार्च, १९४९ चा अंक म्हणून प्रस्तुत "इन्शुअरन्स ॲन्युएल" प्रसिद्ध झालें आहे. १९४८ सालीं, मासिकानें विमा व्यवसायाचे आकडे देणारा खास अंक प्रसिद्ध केला होता, त्याच्या स्वागतानें हें स्वतंत्र इंग्रजी विमा वार्षिक काढण्यास संपादक, श्री. पी. एस. काणे हे प्रेरित झाले. वार्षिकाच्या पहिल्या भागांत १६६ विमा कंपन्यांच्या सर्वसाधारण माहितीचा तपशील देण्यांत आला आहे. दुसऱ्या भागांत वेगवेगळ्या कंपन्यांचे नफ्याविरहित होललाइफ व एन्डौमेंट विम्यांचे हप्ते दिलेले असून पुढें, १९४८ मध्यें विमा कंपन्यांनीं पुऱ्या केलेल्या कामाचे आकडे दिले आहेत. त्यानंतर, रेव्हेन्यु अकाउंट व व्हॅल्युएशन ह्यांचे तुलनात्मक थोडक्यांत आकडे दिले आहेत. १९४८ च्या सरकारी इन्शुअरन्स बुकांतील अधिकृत माहिती व आकडे ह्यांवरूनच प्रस्तुत विमावार्षिक तयार करण्यांत आलें आहे. अशा तऱ्हेचें संकलन करून तें प्रसिद्ध करण्यांत किती अडचणी असतात, ह्याची कल्पना असणारांना श्री. काणे ह्यांच्या प्रस्तुत उपक्रमाबद्दल कौतुक वाटल्याविना रहाणार नाहीं. प्रस्तुत वार्षिकाची पुढील आवृत्ति डिसेंबर, १९४९ मध्यें काढण्याची तयारी आतांपासूनच सुरू झाली आहे. विमावार्षिकास श्री. के. ए. पंडित, बी. एससी., एफ्. आय. ए. (लंडन), ॲक्चुअरी, ह्यांची उद्बोधक प्रस्तावना आहे. ( किं. १ रु. ८ आ. पत्ता: २५२/६, सदाशिव, पुणें २ )

---

### दि कॉमनवेल्थ विमा कं. लि., पुणें

वरील विमा कंपनीनें गेल्या वर्षी ३३,२१,००० रुपयांचे आयुर्विमे स्वीकारले. अहवालाचे वर्षी एकूण उत्पन्न १७,६५,४८४ रु. झालें. लाइफ फंडांत ८,४५,१९५ रुपयांची भर पडून तो ८६,२३,५४७ रु. झाला. खर्चाचें प्रमाण १४·०५% वरून आणखी खाली उतरून तें १३·९२% वर आलें. अहवालाच्या वर्षाच्या अखेरीस कंपनीचें आगीच्या विम्याचें खातें सुरू झालें. त्याचप्रमाणें, कंपनीची मुंबईची शाखा कंपनीच्या तेथील स्वतःच्या इमारतींत नोव्हेंबर, १९४८ मध्यें गेली. कंपनीचा एकूण ताळेबंद १,०१,०२,७९२ रुपयांचा आहे. तिच्या जिंदगीपैकीं सुमारें २० लक्ष रुपये तारणावरील सुरक्षित कर्जांत गुंतलेले असून ५१ लक्ष रुपयांची सरकारी रोख्यांतील इन्व्हेस्टमेंट आहे. म्यु. लोन्स, प्रेफरन्स शेअर्स, इत्यादींमध्यें गुंतवणूक आहे, ती वेगळीच. कंपनीची वार्षिक सभा १७ जुलै रोजीं भरली होती.

---

### नवयुग चित्रपट लि.

वरील कंपनीस ३० एप्रिल, १९४९ अखेर संपलेल्या सोळा महिन्यांच्या वर्षी घसारा काढून ३,००४ रु. नफा झाला, त्याचा विनियोग शिलकी तोटा कमी करण्याकडे केला जाईल. अहवालाचे वर्षी कंपनीनें "फूल और कांटे" व "साजन का घर" हीं दोन चित्रें पुरीं केलीं. स्टूडिओ भाड्यानें देऊन तो रिकामा पडूं दिला नाहीं. "मानाचें पान" ह्या नव्या चित्रास कंपनीनें नुकताच प्रारंभ केला आहे. रावबहादुर एन. वी. देशमुख हे कंपनीचे चेअरमन असून श्री. एस. आर. राजगुरु हे मॅनेजिंग डायरेक्टर व श्री. एच. के. जोशी हे डायरेक्टर-इन-चार्ज आहेत. वार्षिक सभा २६ जुलै रोजीं भरणार आहे.

---

### रेडिओ सेटस्

अमेरिकेंत ९ कोटींचे वर रेडिओ सेट्स आहेत. म्हणजे, दर दोन माणसांमागे एक रेडिओ सेट् असें प्रमाण पडतें.


बेडेकर पापड वापरा.

खून साफ करनेमें मशहूर डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# कांहीं मॅनेजिंग एजंटस

## त्यांच्या उलाढाली व कारभार

[ गेल्या कांहीं वर्षांत बऱ्याच औद्योगिक कंपन्यांच्या व्यवस्थापकांत बदल झालेला आहे. ह्या कंपन्यांची मालमत्ता क्रोडो रुपयांची असून त्यांच्या व्यवस्थापकत्वाची विक्री होतांना भरमसाठ किंमती देण्यांत आलेल्या आहेत. विकत घेणाऱ्यांनीं अशा कंपन्यांच्या भागांपैकीं बरेच भाग एकदम घेऊन व्यवस्थापकांचे हक्क आपल्या स्वाधीन करून घेतलेले आहेत. परंतु अशा प्रकारचे व्यवहार करतांना कांहीं मॅनेजिंग एजंटांनीं बऱ्याच आक्षेपार्ह गोष्टी केलेल्या आढळून आल्या आहेत. बॉंबे शेअरहोल्डर्स असोसिएशनचे सेक्रेटरी श्री. जे. जे. कपाडिआ ह्यांनीं 'इंडियन फिनॅन्स' ह्या अर्थविषयक साप्ताहिकांत ह्यासंबंधांत एक लेख लिहिला आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग 'अर्था'च्या वाचकांसाठी देत आहों. ]

श्री. कपाडिआ लिहितातः—"( १ ) मॅनेजिंग एजन्सी आणि तद्विषयक हक्कसंबंध ह्यांचा सरळ व्यापारी सौदा करण्यांत आलेला आहे. हा सौदा करतांना जास्तीत जास्त किंमत येईल ह्याकडेच लक्ष पुरविलें गेलें असून कंपनीचें स्थैर्य अगर भागीदारांचे हितसंबंध ह्यांना काडीइतकेंही महत्त्व देण्यांत आलेलें नाहीं. मॅनेजिंग एजंट आणि कंपनी ह्यांच्यांतील ऐक्यभावनेमुळें कंपनीचें हित होतें, हा युक्तिवाद कुचकामी ठरला आहे. कंपनींत मॅनेजिंग एजंटाचा बलिष्ठ हितसंबंध असण्यानें कंपनीचा फायदा होतो, हाहि भ्रम नाहींसा झालेला आहे. ( २ ) मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीची हिरीरीनें तरफदारी करणारे स्वतःच मॅनेजिंग डायरेक्टरची जागा पसंत करूं लागले; अर्थातच मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीमुळें कारभारांत सातत्य निर्माण होतें हा दावाहि फोल ठरला आहे. ( ३ ) कंपनी नव्यानें विकत घेणाऱ्यांनीं कंपनीपासून आपला जास्तीत जास्त फायदा कसा होईल इकडेच लक्ष ठेवलेलें दिसून येतें. ज्या ठिकाणीं मॅनेजिंग एजंटस् नव्हते त्या ठिकाणीं त्यांनीं स्वतःसाठीं त्या जागा निर्माण केल्या. कंपनीच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहाराची एजन्सी स्वतःच घेणें, आपल्या पुढ्यांतील नॉमिनीला व्यापारी व्यवहाराच्या कक्षेंत न बसणाऱ्या रकमा देणें व त्यासाठीं जरूर तर कंपनीची मालमत्ता गहाण टाकणें, इत्यादी प्रकारही करण्यांत आले आहेत. एकापेक्षा अधिक कंपन्यांचे एकाच वेळीं डायरेक्टर होऊन अत्यंत गर्हणीय अशा प्रकारचे आर्थिक व्यवहारहि त्यांनीं केलेले आहेत. अशा व्यवहारांना लुटारूपणाचा वास आल्याशिवाय रहात नाहीं. ( ४ ) कायदेशीर युक्त्या लढवून हजारों रुपये नुकसानभरपाई म्हणून घेण्यांत आले आहेत. क्वचित बेकायदेशीर व्यवहारहि करण्यांत आलेले आहेत.

"मेयर मिल्स लि. ह्या कंपनीच्या मालकींत झालेल्या बदलाची हकीकत ह्या दृष्टीनें फार उद्बोधक आहे. ह्या कंपनीच्या विक्रीला काढलेल्या ४०,००० भागांपैकीं २४,००० भाग ई. डी. ससून अँड कंपनी लि. ह्या कंपनीनें धारण केलेले होते. प्रत्येक भाग १०० रुपये किंमतीचा होता. १९४६ च्या एप्रिलच्या सुमारास श्री. रामरतन गुप्ता ह्यांनीं ससून कंपनीच्या मालकीचे सर्व भाग १,२०,००,००० रुपयांना, मेयर मिल्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सीच्या हक्कासुद्धां, विकत घेतले. मॅनेजिंग एजन्सी संबंधीचा करार बी. आर. सन्स लि. ह्या कंपनीच्या नांवानें तबदील करून देण्यांत आला. ३१ डिसेंबर १९४६ अखेरचा कंपनीचा ताळेबंद पाहिला तर कंपनीनें कोणाचेंहि कर्ज काढलेलें नव्हतें; उलट कंपनीजवळ रोकड रक्कम आणि येणें मिळून बरीच रक्कम होती असें दिसून येतें.

"नवीन मॅनेजिंग एजंटसनीं कोणच्या पद्धतीनें कारभार चालविला तें पुढें दिलेल्या माहितीवरून दिसून येईल.

"दि इंडिअन कॉटन सप्लाय लि. आणि इंडिअन स्टोअर्स लि. ह्या दोन खाजगी कंपन्यांना कापूस आणि स्टोअर्स ह्यांचे खरेदी करणारे एजंटस म्हणून नेमण्यांत आलें. ह्या दोन्हीं कंपनींत मॅनेजिंग एजन्सी आणि कांहीं डायरेक्टर्स ह्यांचे हितसंबंध गुंतलेले होते. मेसर्स राम गोपाळ रामप्रसाद ह्या पेढीला कंपनीचे कापडाचे व सुताचे विक्रेते म्हणून नेमण्यांत आलें. कंपनीचा ३१ मार्च १९४७ चा ताळेबंद पाहिला तर असें दिसून येतें कीं कंपनीनें एंपायर ऑफ इंडिआ लाइफ अॅशुअरन्स कं. लि. ह्या विमा कंपनीच्या भागांत १३,३०,९६२ रुपये आणि डिस्काउंट बँक ऑफ इंडिआ लि. ह्या बँकेच्या भागांत ५,९२,६५१ रुपये गुंतविले होते. वरील विमा कंपनी आणि बँक ह्या कंपन्या गुप्ता कुटुंबाच्याच नियंत्रणाखालीं असल्यामुळें ही पैशाची गुंतवणूक 'इंटर कंपनी' ह्या स्वरूपाची झाली हें उघडच आहे. डिस्काउंट बँकेला ह्यानंतर हिंदुस्थान सरकारनें लोकांकडून ठेवी घेण्यास बंदी केलेली आहे. ह्याच ताळेबंदावरून असें दिसून येतें कीं कंपनीनें २०,६३,५०६ रुपयांचीं कर्जें दिलेलीं होतीं. संचालकांच्या अहवालांत हीं कर्जें कोणाला व कां दिलीं होतीं ह्याचा खुलासा नव्हता. त्याचप्रमाणें ताळेबंदांतही कर्जें विना-तारण होतीं कीं तारणावर दिलीं होतीं ह्याबद्दलही माहिती दिलेली नव्हती. मूळच्या ताळेबंदानंतर ऑडिटर फर्ग्युसन अँड कं. आणि मेसर्स बिलीमोरा अँड कं. ह्यांनीं एक पुरवणी अहवाल केला. परंतु तो सर्व भागीदारांना पाठविण्यांत आला नाहीं. ४० सप्टेंबर १९४७ रोजीं भरलेल्या सभेला जे भागीदार हजर होते तेवढ्यांना तो देण्यांत आला. ह्या पुरवणी अहवालावरून, मेसर्स बिहारीलाल रामचरण ह्या कंपनीला ५०,००० रुपये अॅडव्हान्सेस म्हणून देण्यांत आल्याचें दिसून येतें. अशा प्रकारें कर्ज देणें कंपनी कायद्याच्या ८६ डी कलमाविरुद्ध आहे ही गोष्ट अकौंटंटच्या नजरेस आणण्यांत आली. तेव्हां हिशेबाच्या पुस्तकांत ह्या नोंदी चुकून केल्या गेल्या असून पैसे बन्सीधर माधवदास ह्याच्यातर्फे देण्यांत आले होते असें उत्तर मिळालें. त्यानंतर कंपनीच्या हिशेबांतील पहिल्या नोंदी खोडण्यांत आल्या आणि दुरुस्तीच्या नोंदी करण्यांत आल्या. त्याप्रमाणें व्हौचर्सही बदलण्यांत आलीं. ह्यानंतरही बन्सीधर माधवदास ह्यांना कर्जाऊ रकमा देण्यांत आल्या. ह्या व्यवहाराला बोर्डाची अगाऊ परवानगी घेण्यांत आलेली नव्हती. तथापि ऑडिटरांनीं विनंति केल्यावर बन्सीधर माधवदास ह्यांच्याकडून १९–३–४७ ह्या तारखेचें एक पत्र घेण्यांत आलें. ह्या पत्रांत त्यांनीं पूर्वी घातलेल्या रकमा मान्य केल्या आहेत.

"ऑडिटरांनीं आणखी चौकशी केली, तेव्हां असें कळून आलें कीं एका गृहस्थाला ३,५९,००० रुपयांचें कर्ज देण्यांत आलें होतें. हे गृहस्थ दुसरे-तिसरे कोणी नसून एका डायरेक्टरांचे तीर्थरूप होते. बन्सीधर माधवदास कंपनीला १४,०८,३९९ रुपये देण्यांत आले होते. ह्या कंपनीचे गुप्ता घराण्याशी व्यापारी व्यवहार चालत असत. त्याचप्रमाणें लक्ष्मी रतन एंजिनिअरिंग वर्क्स लि. ह्या गुप्तांच्या कंपनीलाही १,९५,००० रुपये रक्कम देण्यांत आलेली आहे. वरील प्रकारचीं कर्जें देण्यासाठीं गुप्तांच्या कंपनीस गिरणीच्या तारणावर एका बँकेकडून ३८,००,००० रुपयांचें कर्ज काढावें लागलें. एंपायर ऑफ इंडिआ कंपनीचे ८४४ भाग मे १९४६ मध्यें प्रत्येक भागाला १,५६५–८–० देऊन विकत घेण्यांत आले. ह्या सुमारास एंपायरच्या भागांचा

भाव १,३०० रुपयांच्या आसपास होता. डिस्काउंट बँकेचे हजारों भाग घेण्यांत आले; त्यांना मार्केट कोटेशन नव्हतें. १ एप्रिल १९४७ पासून सुरू झालेल्या वर्षांत कंपनीची परिस्थिति अधिकच बिघडत चालली. जुलै १९४७ मध्यें कंपनीनें ४॥ टक्के व्याजाच्या दराचीं ३०,००,००० रुपये किंमतीचीं डिबेंचर्स विक्रीला काढलीं. तीं एम्पायर लाइफ कंपनीनें विकत घेतलीं. म्हणजे, मेयर मिल्स कंपनीनें एम्पायरचे भाग विकत घेतले आणि एम्पायर कंपनीनें मेयर मिल्सचीं डिबेंचर्स विकत घेतलीं, असा देखावा दिसून येतो.

"३१ मार्च १९४८ अखेरच्या ताळेबंदांत पुढील माहिती मिळते. ह्या ताळेबंदावर पहिल्या ऑडिटर्सच्या सह्या नसून नवीन ऑडिटर्स नेमण्यांत आलेले दिसून येतें. एम्पायर लाइफ कंपनीच्या भागांची दर्शनी किंमत १३,२४,१०७ रुपये दाखविण्यांत आली आहे. परंतु त्यासंबंधीच्या टीपेंत भागांची बाजारांतील किंमत ६,६२,००० रुपये असल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. मेयर मिल्सनें लक्ष्मी रतन एंजिनिअरिंग वर्क्स लि. मध्यें एकूण ४,५०,००० रुपये गुंतविल्याचें दिसून येतें. ह्या कंपनीला ता. ३०–३–४६ ते ३१–३–१९४८ पर्यंत ६१,४७३ रुपयांचा तोटा आलेला आहे आणि प्रेफरन्स भागावरील डिव्हिडंड थकलेलें आहे. ह्याशिवाय वैयक्तिक तारणावर दिलेलीं १८,१४,३७९ रुपयांचीं कर्जें आहेत. मेयर कंपनीच्या धंद्यांतील मालमत्तेच्या तारणावर १४,६८,१४० रुपयांचें कर्ज एका बँकेकडून काढण्यांत आलेलें दिसून येतें.

"वरील वस्तुस्थितीवरून नव्या मॅनेजिंग एजंटांनीं पुढील व्यवहार केल्याचें आढळतें.

(१) आपल्याशीं संबंधित कंपन्यांस खरेदीचे आणि विक्रीचे एजंट नेमणें,

(२) कंपन्यां–कंपन्यांतून आप-आपसांत पैसे गुंतविणें,

(३) कंपनीच्या वास्तविक उद्देशांशीं संबंध नसलेलीं कर्जें वैयक्तिक तारणावर देणें,

(४) वरील हेतूंसाठी पैसा उभारण्याकरितां डिबेंचर्स काढून कंपनी गहाण टाकणें आणि धंद्यांत गुंतलेल्या कंपनीच्या स्टॉक-इन ट्रेडच्या तारणावर बँकेकडून कर्ज काढणें."

## सेंट्रल बँकेची पुणें शाखा

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. नें १९०, रविवार पेठ येथें आपली पुणें शाखा सोमवार, ता. १८ जुलै रोजीं सुरू केली. ही बँक १९११ सालीं स्थापन झाली. तिच्या सुमारें पावणे चारशे शाखा असून तिचें खेळतें भांडवल १३२ कोटी रुपयांवर आहे. तिचें वसूल भांडवल ३,१४,५४,२५० रु. आहे आणि तिचे रिझर्व्ह व इतर फंड ४,०४,०७,४०० रुपयांचे आहेत.

मुंबई हायकोर्टाचा निवाडा

## बँकेच्या वायंडिंग-अप अर्जापूर्वीं जमा केलेली रक्कम

### लिक्विडेशनच्या जिंदगींत तिचा समावेश होत नाहीं; मालकास ती देऊन टाकली पाहिजे.

नॅशनल सिक्युरिटी बँकेच्या तळोदे शाखेवर काढलेले, एकूण ५ हजार रु. चे तीन चेक बँक ऑफ इंडिया, मुंबई, ह्या बँकेंत फेब्रुवारी, १९४७ मध्यें भरण्यांत आले. त्यांच्या वसुलीसाठी बँक ऑफ इंडियानें ते नॅशनल सिक्युरिटी बँकेच्या मुंबई कचेरीकडे पाठविले.

नॅशनल सिक्युरिटी बँक गुंडाळण्यांत यावी, असा अर्ज मुंबई हायकोर्टाकडे तारीख २१ फेब्रुवारी, १९४७ रोजीं करण्यांत आला तो मान्य करून मुंबई हायकोर्टानें "वायंडिंग अप" चा हुकूम दिला. "वायंडिंग-अप" चा अर्ज दाखल केला असेल, तेव्हांपासून "वायंडिंग-अप" ला प्रारंभ होतो, असें कंपनी कायद्याचें १६८ वें कलम सांगतें. म्हणजे, प्रस्तुत प्रकरणीं २१ फेब्रुवारीपासून "वायंडिंग अप" चा हुकूम अंमलांत आला.

ऑफिशिअल लिक्विडेटरपुढें बँक ऑफ इंडियानें असें म्हणणें मांडलें, कीं ह्या चेक्सची रक्कम त्या बँकेसाठी नॅशनल सिक्युरिटी बँकेनें ट्रस्ट म्हणून ठेवली असल्यानें, ती रक्कम मिळण्याचा बँक ऑफ इंडियाला अग्रहक्क आहे. तथापि, इतरांपेक्षा बँक ऑफ इंडियाचें येणें वेगळ्या प्रकारचें नाहीं, असें लिक्विडेटरनें ठरविलें.

बँक ऑफ इंडियानें मुंबई हायकोर्टाकडे अर्ज करून, "नॅशनल सिक्युरिटी बँकेच्या "वायंडिंग-अपचा" हुकूम होण्यापूर्वीच ५,००० रुपयांची रक्कम बँक ऑफ इंडियासाठी नॅशनल सिक्युरिटी बँकेकडे ट्रस्ट म्हणून होती; लिक्विडेशनमधील जिंदगींत तिचा समावेश होत नाहीं; ती लिक्विडेटरचे अधिकारांत येत नाहीं; तेव्हां ती रक्कम आम्हांस द्यावी, असा लिक्विडेटरला हुकूम द्यावा "अशी मागणी केली.

### हायकोर्टाचा निवाडा

५,००० रुपयांच्या तीन चेकपैकी २,००० रुपयांच्या एक चेकचे पैसे १५ फेब्रुवारी रोजीं तळोदे शाखेनें मुंबईच्या मुख्य कचेरीच्या खातीं जमा केले. म्हणजे, "वायंडिंग-अप" सुरू होण्यापूर्वीं हा व्यवहार झाला म्हणून त्या बाबतींत मुंबईची कचेरी त्या पैशापुरती बँक ऑफ इंडियासाठी ट्रस्टी बनली. "मुख्य कचेरीच्या खातीं शाखेनें पैसे जमा केले, ते आम्ही मान्य करीत नाहीं; आम्हांस रोख पैसे मिळाले पाहिजेत" अशी कोणतीच बँक म्हणूं शकणार नाहीं. बाकीच्या दोन चेकचे पैसे तळोदे शाखेनें मुख्य कचेरीच्या खातीं २१ फेब्रुवारी रोजीं जमा केले. त्याच दिवशीं २ वाजून ४५ मिनिटांनीं "वायंडिंग-अपचें" प्रकरण सुरू झालें. तेव्हां, ह्या क्षणापूर्वीं हे पैसे जमा केले, का त्यानंतर केले, हें निश्चित करण्यासाठी साक्षीपुराव्याकरितां १६ ऑगष्ट, १९४९ ही तारीख नेमण्यांत आली.


व्यापार—उद्योग

व्यापार व उद्योगविषयक प्रमुख मराठी मासिक

'विमा' विषयावरील विविध अंगोपांगांनीं युक्त असे लेख, मुलाखती, समालोचन व इतर उपयुक्त माहितीनें भरगच्च भरलेला संग्राह्य असा सचित्र

'खास विमा विशेषांक'

ऑगस्टमध्यें प्रसिद्ध होणार. तरी आपली प्रत आजच नोंदवा.

पानें १००] दुरंगी मुखपृष्ठ [ किं. १ रु.

★ पण वर्गणीदारांना मात्र ८ आण्यांत.
★ तरी आजच वर्गणीदार व्हा. वार्षिक वर्गणी ६ रु.
★ एजंट्सनीं आपल्या प्रती लवकर नोंदवाव्यात.
★ जाहिरातदारांनीं त्वरा करावी. ★ जाहिरातीचें उत्कृष्ट माध्यम

अधिक माहितीसाठीं लिहाः—

व्यवस्थापक—मोहाडीकर बंधू,
१०, गंगानिवास—रानडे रोड, दादर, मुंबई १४



आपली शेती

या मासिकाचा तिसऱ्या वर्षाचा प्रथम अंक श्रीगुरुपौर्णिमेच्या शुभ दिवशीं प्रसिद्ध होईल.

पृष्ठें ५०] [ किंमत १। रुपया.

सर्व वैशिष्टयें अन् विषय यांत येतील.

—: कांहीं शीर्षकें :—

शेतकऱ्याचें अवजार ★ महत्त्वाचें धान्यपीक
फळबाग–भाजीपाला ★ गतवर्षाचे कीटक
सूक्ष्म वनस्पतिरोग ★ बैलाची मान
पशुपालन–सहकार–संशोधन–जंगल–ग्रामोद्योग
हे महत्त्वाचे विभाग
भूमि—पाणी—खतें
गायरानांतील गंमत—यशस्वी (मुलाखत)

## कूळ कायदा

### " लॉ ॲकॅडेमी " चें नवें प्रकाशन.

निरनिराळया कायद्यांवरील सटीक मराठी पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें महत्त्वाचें उपयुक्त कार्य पुण्याच्या ' लॉ ॲकॅडेमी ' कडून गेलीं कित्येक वर्षे यशस्वी रीतीनें करण्यांत येत आहे. ' लॉ ॲकॅडेमी ' नें आतां १९४८ च्या कूळ व शेत जमीन कायद्यावरील आपलें नवें प्रकाशन नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील विषयाची मांडणी व प्रत्येक मुद्यावर क्रमशः केलेलें सविस्तर विवेचन नामांकित कायदेपंडितांच्या नांवाजलेल्या ग्रंथांच्या धर्तीवर साधलें आहे. ग्रंथांतील विषयासंबंधीं अन्यत्र पहावयाची माहिती अभ्यासू दृष्टीनें संदर्भासहित नमूद करण्यांत आली आहे. मराठी भाषांतराबरोबर इंग्रजींतील मूळ कायदाहि दिलेला असल्याकारणानें पुस्तकास परिपूर्णता आली असून त्याची उपयुक्तता वाढली आहे. मात्र कांहीं ठिकाणीं अनवधानानें व कांहीं ठिकाणीं मुद्रितें तपासण्यांत कसूर झाल्यामुळें कांहीं दोष राहून गेले आहेत. उदाहरणार्थ, कलम ८५ ( २ ) चें भाषांतर चुकीचें झालें आहे. कलम ४० मधील खुलासा ( एक्स्प्लनेशन ) मराठी भाषांतरांत आलेला नाहीं. हे दोष किरकोळ आहेत खरें, परंतु ' लॉ ॲकॅडेमी ' ज्या दर्जाचें काम करूं इच्छिते त्या दृष्टीनें तिचीं प्रकाशनें सर्वस्वी निर्दोष व्हावींत हेंच उत्तम.

पुणें २ } स. वा. दांतार
बी. एससी., एलएल. बी.

---

### वाळवें तालुक्यांतील फिरतें वाचनालय

सातारा जिल्ह्यांतील वाळवें तालुक्यांत नवीन उपक्रम म्हणून सुरू असलेल्या फिरत्या वाचनालयास सातारा जिल्ह्याच्या कलेक्टरांनीं तीन हजार रुपये देणगी दिल्याचें कळतें. सदरहू वाचनालयानें खेडेगांवांत वाचनाची गोडी उत्पन्न केली असून तें यशस्वी झाल्याचें, वाळवें तालुक्याचे मामलतदार श्री. शामसुंदर महारुद्र होनराव यांनीं सांगितलें. वरील बाबतींत तालुक्यांतील पुढाऱ्यांनीं पण आर्थिक व इतर मदतही बरीच केल्याचें कळतें. इस्लामपूर येथील डॉ. भगवंतराव कुलकर्णी हे वाचनालयाचे खजिनदार असून मामलतदार श्री. होनराव हे ह्या वाचनालयाचे चेअरमन आहेत.

### दरसाल ३० कोटी कृत्रिम दांतांस मागणी

इंग्लंडमध्यें प्लॅस्टिक ( ॲक्रिलिक ) दांतांना पुष्कळच मागणी आहे. तेथील एक कंपनी असे २,५०,००,००० दांत दरसाल तयार करते. लवकरच दरसाल ४,५०,००,००० दांत ती करूं लागेल. दरसाल सुमारें ३०,००,००,००० ॲक्रिलिक दांतांस जागतिक मागणी आहे.

### मारवाडी चेंबरचें नवें नांव

मुंबईच्या मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्सचें नांव बदलून आतां तें १ जुलैपासून वेस्टर्न इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स लि. असें ठेवण्यांत आलें आहे.

### अमेरिकेंतील आयुर्मर्यादा

अमेरिकेंतील पुरुषाचें सरासरी आयुष्य ६२ वर्षें असून स्त्रीचें ६७ वर्षें आहे.

### अमेरिकन वृत्तपत्रांची पृष्ठसंख्या वाढली

१९४५ चे मानानें आतां अमेरिकेंतील वृत्तपत्रांतील जाहिराती ६०% वाढल्या आहेत. त्यामुळें वृत्तपत्रांची पृष्ठसंख्याहि वाढली आहे.


उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादीसाठीं चौकशी करा:—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५११

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )

( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन
( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )

( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट
( ले.:—. रेवि ॲले, किं. २ रु. )

( ४ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉम्बे प्रॉव्हिन्स
( ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ. )

**दि रत्नाकर बँक, लि.**

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B, मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.